**नियमीत दिवाणी दावा क्र २०८/२०२३**
**संजय वि भिमराव**
**निशाणी क्र ९०**

**<u>प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्रमांक २ - सतीश शिवाजी ठावरे, वय ४२ वर्षे, धंदा शेती, राहणार पटेल चौक, कुर्डुवाडी, तालुका माढा, जिल्हा सोलापूर.</u>**

१. शपथेवर निवेदन करतो की, पुरावा शपथपत्रातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असून तो मी वाचून त्यावर माझी स्वाक्षरी केली आहे. शपथपत्रातील मजकूर खरा व बरोबर आहे.

**<u>उलटतपास वादीतर्फे वकील, श्री वाय बी साठे</u>**

२. मी दहावी शिकलो आहे. आमच्या मिळकतीचा गट नंबर ३५० असा असून, ती माझ्या वडिलांच्या नावे आहे. मला दिशा समजतात. हे म्हणणे खरे नाही की, हल्ली मी पटेल चौक, कुर्डुवाडी येथे राहत नाही. मी कुर्डुवाडी येथे लहानपणापासून राहतो. आम्ही राहतो त्या मिळकतीचा सिटी सर्व्हे क्र १३४९ असा आहे. वादीच्या मिळकतीचा मी सिटी सर्व्हेचा उतारा पाहिलेला नाही. वादीच्या मिळकतीचे क्षेत्र किती आहे ते मला माहिती नाही. मी प्रतिवादी यांचे मिळकतीचा देखील सिटी सर्व्हेचा उतारा पाहिलेला नाही. प्रतिवादीच्या मिळकतीचा सिटी सर्व्हे क्रमांक १३५६ असा आहे. पण त्याचे क्षेत्रफळ किती आहे ते मला सांगता येणार नाही.

३. वादमिळकतीचा सिटी सर्व्हे क्रमांक १३५५ असा आहे. पण मी त्याचा उतारा पाहिलेला नाही. तसेच त्याचे क्षेत्रफळ देखील माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादमिळकती संदर्भात मला काहीही माहिती नसताना त्याबाबत मी खोटे कथन पुरावाशपथपत्रात केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी संजय व सर्जेराव यांची घरी एकमेकांना चिटकून आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वादींच्या घराच्या दक्षिण बाजुस बोळ आहे. वादमिळकतीच्या पूर्व बाजुस बोळ आहे, पश्चिमेस रस्ता आहे, दक्षिणेस अनिल भिमराव कांबळे यांची मिळकत व उत्तरेस संजय कांबळे यांची मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकतीच्या दक्षिण बाजुस भिमराव कांबळे यांचे जुने घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, जुने बांधकाम पाडून त्याठिकाणी नवीन बांधकाम सुरु झालेले आहे. साक्षीदार पुढे सांगतो की, ते बांधकाम आता बंद आहे.

४. हे म्हणणे खरे नाही की, भिमराव कांबळे यांच्या घराच्या पाठीमागे अंकुश मोरे या इसमाचे घर आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ते लांब आहे. ते ६० ते ७० फूट अंतरावर असावे. हे म्हणणे खरे आहे की, भिमराव कांबळे व अंकुश मोरे या दोघांच्या घरामध्ये जाणे-येण्याकरीता एक बोळ आहे. प्रतिवादी भिमराव कांबळेच्या पश्चिम बाजुस कुर्डुवाडी नगर पालिकेचा सार्वजनिक रस्ता आहे. तो रस्ता पश्चिमेकडुन पूर्वेकडे येवून पुढे दक्षिणेकडे नुतन शाळेकडे जातो. हे म्हणणे खरे नाही की, नगर पालिकेच्या रस्त्यानेच प्रतिवादी भिमराव, वादी संजय हे स्वतःच्या मिळकतीमध्ये जात-येत असत. हे म्हणणे खरे आहे की, वादी प्रतिवादीच्या मिळकतीमध्ये असलेल्या बोळीला चिटकूनच नगर पालिकेचा वरील रस्ता आहे. बोळीची रुंदी चार ते सव्वा चार फूट असावी, परंतु लांबी मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदरची बोळ ही पुर्व-पश्चिम चालीची आहे.

५. प्रतिवादींनी त्यांचे बांधकाम करण्यासाठी परवानगी घेतलेली आहे असे मला म्हणाले होते. हे म्हणणे खरे आहे की, वादी संजयने देखील त्याचे जुने घर पाडून त्या जागेवर नवीन बांधकाम केले आहे व ते शासकीय घरकुल योजनेतील घर आहे. विठ्ठल व भारत ठावरे हे माझे चुलते आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे चुलते व माझा दूधाचा व्यवसाय आहे. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, आमचा शेतीचा देखील व्यवसाय आहे. हे म्हणणे खरे आहे की, पूर्व-पश्चिम चालीच्या नगर पालिकेच्या रस्त्यालगत दक्षिण बाजुस शाळेची भिंत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही पाळत असलेल्या आमच्या म्हशी ह्या नगर पालिकेच्या रोडच्या भिंतीलगत आम्ही बांधत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या म्हशी आम्ही रस्त्यावर बांधत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या म्हशी रस्त्यात बांधत असल्यामुळे लोकांना जाणे-येणेस त्रास होत होता.

६. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे वादी संजय याने आमच्या विरुद्ध म्हशी बांधत असलेल्या जागेच्या संदर्भात कुर्डुवाडी नगर परिषदेकडे तक्रारी अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही आता आमच्या म्हशी शेतात बांधत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आम्हाला आमच्या म्हशी दुसऱ्या जागेकडे न्यावयाला लागल्याने आम्ही वादी संजयवर राग आहे. हे म्हणणे खरे नाही की, म्हणून प्रतिवादीच्या सांगण्यावरुन वादीच्या विरुद्ध साक्ष देण्यास आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुरावाशपथपत्रातील संपूर्ण निवेदन खोटे आहे. प्रतिवादींची जुनी मिळकत पाडण्यापूर्वी मी ती पाहिलेली होती व आहे. वादीच्या मिळकती देखील मी पूर्वीपासून पाहत आलेलो आहे.

**७.** प्रतिवादींनी बांधकाम सुरु करण्याकरीता बांधकामाचे खड्डे खोदलेले होते. याक्षणी साक्षीदारास निशाणी ४ सोबत दाखल असलेले फोटोग्राफ्स दाखवून वादीच्या वकीलांनी प्रश्न केला की, फोटोत दिसून येत असल्याप्रमाणे वादी व प्रतिवादीच्या मिळकतीची स्थिती व आहे, यास प्रतिवादींचे विधिज्ञ आक्षेप नोंदविला की, वादींनी त्यांचे दाखल फोटोग्राफ योग्य तो पुरावा सादर करुन सिद्ध करणे आवश्यक असून साक्षीदारास दाखवलेले फोटो हे वादमिळकतीचे आहे किंवा काय हे त्याला कसे सांगता येईल. तथापि, साक्षीदाराचे उत्तर की, मला दाखवलेल्या फोटोप्रमाणे जागेवर स्थिती आहे. निशाणी ४ लगत दाखल असलेला फोटो क्र १ यामध्ये प्रतिवादीच्या घरासमोर खड्डा खोदलेला दिसून येतो. हे म्हणणे खरे नाही की, फोटो क्र २ मध्ये दिसून येत असलेला खड्डा हा प्रतिवादी क्र १ च्या घरासमोरील खड्डा आहे. फोटो क्र ४ यामधील दिसून येत असलेला खड्डा हा खिडकी समोरील आहे. मला सांगता येणार नाही की, फोटोमधील खोदलेल्या खड्डयांमुळे वादींना त्यांच्या मिळकतीमध्ये जाणे-येण्यास रस्ता असलेला दिसून येतो की नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, वादींना जाणे-येण्यास बोळ उपलब्ध आहे. फोटो क्र ६ मध्ये प्रतिवादीच्या घराचा कॉलम हा वादीच्या घरासमोर असल्याचे दिसून येते.

प्रश्न - प्रतिवादीने सुरु केलेल्या बांधकामामुळे वादींना त्याच्या मिळकतीमध्ये जाणे-येण्यास अडचण निर्माण झालेली आहे ?

उत्तर - बांधकाम होत असताना अडचण येणारच.

**८.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी अतिक्रमण करुन बांधकाम केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी त्यांचे घराचे बांधकाम हे वादी येत-जात असलेल्या बोळ हिच्या जागेवर देखील केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीच्या बाजुने खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

KARADE RATILAL MACHINDRA

Digitally signed by KARADE RATILAL MACHINDRA
Date: 2025.08.14 16:09:19 +0530

(आर एम कराडे)

दिनांक - १४/०८/२०२५.

दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर, माढा.